"शाहू, फुले, आंबेडकर" पुरस्कारासाठी
सन २०१७-१८ व सन २०१८-१९ करिता
सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या
सामाजिक संस्थांची निवड करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**शासन निर्णय क्रमांकः पुरस्कार - २०१९/प्र.क्र.३१ /समन्वय**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
तारीख: २७ फेब्रुवारी, २०१९.

**वाचा :** १. शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक, इबीसी -२००३ /प्र.क्र.४५६/मावक-२, दि.६ जून, २००५.

२. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक बीसीएच-२००९/प्र.क्र.२३/ बांधकामे, दि.३१ ऑगस्ट, २०१२.

३. शासन निर्णय क्र.पुरस्कार २०१९/प्र.क्र.२६/समन्वय, दि.२५ फेब्रुवारी, २०१९.

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र राज्यात विविध क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थाच्या सामाजिक न्यायाच्या क्षेत्रातील योगदानामुळे महाराष्ट्राचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर एक प्रगत सामाजिक सुधारणावादी राज्य म्हणून घेतले जाते. सामाजिक न्यायाच्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या संस्थांना महाराष्ट्रातील सर्वोच्च प्रतिष्ठेचे "शाहू, फुले, आंबेडकर" पारितोषिक देण्यात येते. सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या वर्षाकरिता राज्यातील एकूण ६ महसुली विभागातील प्रत्येकी २ याप्रमाणे प्रत्येक वर्षासाठी १२ संस्थांची निवड करण्याचे ठरविले आहे. त्यानुसार सदर संस्थांना प्रत्येकी रु.७.५० लक्ष (अक्षरी रुपये सात लाख पन्नास हजार) याप्रमाणे पारितोषिकाची रक्कम, स्मृती चिन्ह देऊन सन्मानित करण्याचा निर्णय संदर्भाधीन क्र.३ येथील दि.२५.२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या वर्षाकरिता "शाहू, फुले, आंबेडकर" पुरस्कारासाठी सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या राज्यातील एकूण ६ महसुली विभागातील प्रत्येकी २ याप्रमाणे प्रत्येक वर्षासाठी १२ संस्थांची निवड करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या वर्षाकरिता "शाहू, फुले, आंबेडकर" पुरस्कारासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीने निवड केलेल्या संस्थांची नावे सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविण्यात आली असून त्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर आदेशातील पुरस्कारासाठी निवडलेल्या संस्था पुरस्काराबाबत विहित केलेले निकष पूर्ण करीत आहेत व सदर संस्था कार्यरत आहेत या अटीच्या अधीन राहून सदरचे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

३. याबाबत आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणुन घोषित करण्यात येत असून या कामी होणारा खर्च खालील लेखाशीर्षातून भागविण्यात यावा.

"मागणी क्र. एन ३

मुख्य लेखाशिर्ष

२२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण

८०-सर्वसधारण

८०० इतर खर्च

(०१) मागासवर्गीयांना अनुदाने

(०१) (०७) शाहू, फुले, आंबेडकर यांच्या नावाने पारितोषिक देणे (विघयो)

(२२२५ ३६६३), ०५-बक्षीसे"

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१९०२२८१७५८०१३९२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SIDDHARTH AMRUTRAO ZALTE

Digitally signed by SIDDHARTH AMRUTRAO ZALTE
DN: CN = SIDDHARTH AMRUTRAO ZALTE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SOCIAL JUSTICE AND SPL ASSISTANCE DEPT
Date: 2019.02.28 18:01:53 +05'30'

(सि. अ. झाल्टे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
७) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
८) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१०) सर्व विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय.
११) सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय.
१२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१३) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग.
१४) सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग
१५) सर्व संबंधित व्यक्ती /संस्था.
१६) निवडनस्ती (समन्वय).

# अर्जाचा नमुना (संस्थेसाठी)

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**पुरस्काराचे नांव:-**

**वर्ष:-**

**जिल्ह्याचे नांव:-**

| | | |
|---|---|---|
| १. | संस्थेचे पूर्ण नांव :- | |
| २. | संस्थेचा पुर्ण पत्ता :- | |
| ३. | संस्थेचा नोंदणी :-<br>१. संस्था नोंदणी अधिनियम, १८६०<br>२. मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५०<br>वरील प्रमाणपत्रे प्रती सोबत जोडावी | |
| ४. | संबंधीत संस्थेचे कार्यक्षेत्र | |
| ५. | संस्थेच्या कार्यकारी मंडळातील अध्यक्ष/सचिव यांचे नांव, पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक - इत्यादी सविस्तर माहिती. | |
| ६. | सदर संस्थेविरुध्द अथवा संस्थेच्या पदाधिकाऱ्यावर फौजदारी गुन्हा दाखल झाला नसल्याबाबतचा जिल्हा पोलीस विभागाचा दाखला. | |
| ७. | संस्थेचा लेखापरीक्षणाचा तीन वर्षाचा अहवाल. | |
| ८. | संबंधीत संस्था सुरु झाल्याचा दिनांक | |

<table>
<tr><td>९.</td><td>जिल्हा दक्षता समितीचे शिफारस पत्र</td><td></td></tr>
<tr><td>१०.</td><td>संस्थेच्या घटनेची प्रमाणित प्रत व मागील ५ वर्षाचा वार्षिक अहवाल.</td><td></td></tr>
<tr><td>११.</td><td>सदर संस्थेस पुरस्कार मिळणेसाठी शिफारस केलेल्या सन्मानिय व्यक्तीचे नाव/पदनाम</td><td></td></tr>
<tr><td>१२</td><td>संस्थेचे वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांचा तपशिल.<br>(प्रती सोबत जोडाव्या)</td><td></td></tr>
<tr><td>१३</td><td>संस्था माध्यमातून व्यक्तीगत अथवा सामूहिक सेवा दुर्बल घटकांना व मागासवर्गीयांसाठी घेत असलेले उपक्रम. असल्यास, कोणत्या स्वरुपात व त्यांनी घेतलेल्या उपक्रमांचा सविस्तर तपशिल.<br>(प्रती सोबत जोडाव्या)</td><td></td></tr>
<tr><td>१४.</td><td>समाज कल्याण क्षेत्रात मातंग समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण, आरोग्य, अंधश्रध्दा निर्मुलन, जनजागृती इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय केलेली कामगीरीचा तपशील (साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे पुरस्कारासाठी)</td><td></td></tr>
<tr><td>१५.</td><td>समाज कल्याण क्षेत्रात चर्मकार समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण, आरोग्य, अन्यायनिर्मुलन इत्यादी क्षेत्रात केलेल्या कामगीरीचा तपशील (संत रविदास पुरस्कारासाठी)</td><td></td></tr>
<tr><td>१६.</td><td>संस्थेने उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांना शासना मार्फत किंवा विभिन्न संस्थेमार्फत सत्कार अथवा पारितोषिक मिळाले असल्यास त्याचा तपशिल.</td><td><table>
<tr><th>अ.क्र</th><th>पारितोषिका चे नांव</th><th>कोणामार्फत देण्यात येतो.<br>( संस्था/ विभाग)</th><th>वर्ष दिनांक</th></tr>
<tr><td>१</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>२</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>३</td><td></td><td></td><td></td></tr>
</table></td></tr>
<tr><td>१७.</td><td>भूमीहीन शेत मजुर व कामगारांसाठी केलेल्या उल्लेखनीय कामाचा तपशील (पदमश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कारासाठी)</td><td></td></tr>
</table>

| १८. | संस्थेचा सार्वजनिक क्षेत्रातील एकूण अनुभव | |
|---|---|---|

टिप : प्रत्येक पुरस्कारासाठी स्वतंत्र अर्ज करावा, एका वर्षात एकाच पुरस्कारासाठी विचार केला जाईल.

दिनांक : / /२०२२

(संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांचे स्वाक्षरी व नांव )
संस्थेचा शिक्का

## कार्यालयीन उपयोगासाठी:-

प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग/ सहायक आयुक्त, समाजकल्याण / जिल्हा दक्षता समितीचे अभिप्राय / शिफारस-----------------------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------------------

प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण विभाग

सहायक आयुक्त, समाज कल्याण